Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 860 – 863

DOI: 10.5281/zenodo.10281672

Original Research Article

# गांधीजीच्या सत्य व अहिंसेची प्रासंगिकता

प्रा. डॉ. मुसळे हनुमान

इतिहास विभाग, स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी जि. परभणी ४३१५०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: musalehanuman@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

ज्या कामातून आपण चांगला माणूस बनू शकतो, अशा कामावर गांधीजी विश्वास ठेवत. गांधीजी हे या शतकातील महान नेते आहेत. सत्याला बोलण्याची गरज पडत नाही, ते आपल्या कृतीतून दिसते. ज्या कामातून आपण चांगला माणूस बनू शकतो, अशा कामावर गांधीजी विश्वास ठेवत. सत्याची कास धरल्यास मानवाचा नक्की विकास होईल. हे मात्र गांधीजींच्या सत्याचे प्रयोग असलेल्या जीवनचरित्रावरूनही प्रकट होतच आहे. सत्याला खूप किंमत असते आणि त्याची किंमत चुकवावी लागते. कारण, सत्य अनमोल असते. आजही जगभराच्या परिप्रेक्षात पाहिले तर सत्याचे तेज स्वीकारणे प्रत्येकालाच जमते असे नाही. पण तो योग येतोच येतो की, सत्याशिवाय पर्यायच राहत नाही.

## अहिंसा म्हणजे निर्भयता

गांधीजी म्हणतात की, "सत्य माझ्यासाठी सर्वतोपरी सिद्धांत आहे. मी वचन आणि चिंतनामध्येही सत्य स्थापना करण्याचा प्रयत्न करतो. या सत्याच्या शोधासाठी मी माझ्या प्रिय वस्तूचेही बलिदान करू शकतो."गांधीजींच्या विचारांतून सत्याचे स्वरूप म्हणजे केवळ आणि केवळ ईश्वर आहे हेच स्पष्ट होते. त्याचप्रमाणे दुसरे तत्त्व अहिंसा. अहिंसा म्हटली की खूप जणांच्या बोलण्यातून व्यक्त होते की, गांधीजींची अहिंसा म्हणजे समोरच्याने एका गालात मारली तर दुसरा गाल पुढे करावा. मार खाऊन घ्यावा, मार खाता खाता दुर्बलतेने पडून लाचार व्हावे. पण गांधीजींचे अहिंसेचे तत्त्व हेच होते का ? मुळीच नाही. अहिंसा ही बलवानांनाच शोभते. नव्हे ते दुर्बलांचे अस्त्रच नव्हे. लाचारीने मुकाट समोरच्याचा अन्याय सहन करणाऱ्याला अहिंसा शोभतच नाही, असे महात्मा गांधींचे म्हणणे होते. अहिंसा म्हणजे मनावरचे संपूर्णत: नियंत्रण. रागाने, हिंसेने एखाद्या प्रश्नांची उकल होत नाही आणि झाली तरी ती पुढच्या अराजकतेची

नांदी आहे, असे गांधीजींना वाटे. त्यामुळे हिंसेला हिंसेने उत्तर देणे यावर त्यांचा विश्वास नव्हता. ते म्हणत, डोळयाबद्दल डोळा फोडला तर अर्धे जग आंधळे होईल. रागाला लोभाने, अंधाराला प्रकाशाने जिंकावे. मात्र, गांधीजींचे सत्य आणि अहिंसेचे विचार हे सतीचे वाणच आहेत. कुणीही ही अग्निपरीक्षा देऊ शकतच नाही. कारण सरळ आहे. प्रचंड निग्रह, विरक्ती असल्याशिवाय माणूस अहिंसेचे तत्त्व पाळूच शकत नाही. आजच्या भौतिकवादाच्या जगात प्रश्न पडतो की, आज परमाणुबॉम्ब आहेत. माणसाला मारण्यासाठीचे अनेक उपाय, हत्यारे तयार आहेत. माणूसही इतका बदलला आहे की दुसऱ्याला मारण्यासाठी त्याला छोटेसे कारणही पुरते. मग अहिंसेचे तत्त्व चालणार कसे? पण मुळात अहिंसा म्हणजे मरण्या आणि मारण्यापुरतीच संक्षिप्त आहे का? भावनातिरेकाने एखाद्यावर हात उचलल्यावर आपला हात आवरता घेणे इतकेच आहे का? जगभर दहशतवादाचा राक्षस थैमान घालत आहे. इसिस, अल कायदा, बोको हराम, माओवादी आणि न जाणे कोणत्या कोणत्या दहशतवादी संघटना मानवतेला काळीमा फासत आहेत. या सगळयांना दहशतवाद फैलावण्यासाठी मानवीबळ मिळते कुठून? जीवंत, निष्पाप माणसाला क्रूरतेने मारणारी मानसिकता यांच्यात येतेच कुठून? या सगळयांना बदलावे कसे? जगभरात यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सगळयांचाच खात्मा करून हा प्रश्न सुटणारच नाही. या गर्तेत या नरकात आयुष्य संपवू इच्छीनाऱ्याच्या हृदयातील माणुसकी जागी करणे हा एक उपाय आहे. ही अहिंसा वर सांगितल्याप्रमाणे केवळ मार खाणे नाही तर, अशा दहशतवाद्यांच्या हृदयातला सैतान संपवण्यामध्ये आहे. हे मोठे कठीण काम आहे. संयम, चिकाटी सावधता आणि तितकीच निर्भयता असणारी व्यक्ती हे करू शकते. कारण, या लोकांशी संपर्क, संवाद, त्यांचे परिवर्तन, नंतर पुनर्वसन करण्यासाठी प्रचंड तळमळ, आशावाद आणि निर्भयता हवी आहे. समोरच्या व्यक्तीच्या मनात ईश्वर आहे आणि त्याला जागृत करू शकतोच हा प्रचंड आशावाद गांधीजींच्या मनात होता. तो आशावाद, ती निर्भयता म्हणजेच अहिंसा होय.

गांधीजी त्यांच्या सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रामध्ये लिहितात. चोरून विड्या ओढायचे, मांसाहार करायचा, पैसे चोरायचे अशा त्यांना वाईट सवयी लागल्या होत्या. एका घटनेमध्ये ते वडील भावाचा सोन्याचा कडा विकतात. गांधी घराणे सुसंस्कृत, खऱ्या अर्थाने धर्मप्रवण, वैष्णववृत्तीचे. आपण दुराचार करत आहोत ही सल गांधीजींना होती. त्यामुळे एका पत्रात ते हे सगळे लिहितात आणि पत्र वडिलांना देतात. महात्मा गांधीजींना वाटले की, आपल्या मुलाने चोरी केली, मांसाहार केला, विड्या ओढल्या म्हणून आपले वडील रागावतील, भयंकर मारतील. गांधीजी मार खाण्याच्या तयारीतच राहतात. पण पत्र वाचल्यावर गांधीजींच्या वडिलांच्या डोळयातून घळघळा अश्रू वाहू लागतात. या अश्रूचे कारण काय असावे? एक कारण असू शकते की, इतक्या संस्कारीत घरातल्या बालकाने असे वागावे याचे दु:ख. दुसरे कारण असेही असू शकते की, आपल्या मुलामध्ये चांगल्या-वाईट कृत्याची, नैतिक जाण आहे. त्यांनी कबूल तरी केले की, त्यांनी नीतिबाह्य वर्तन केले. म्हणजेच या मुलाच्या मनातला चांगुलपणा जीवंत आहे. ते अश्रू त्या मुलाच्या चांगुलपणाला समर्पित होते का? अर्थात, काहीही असेल पण गांधीजी म्हणतात, वडिलांच्या डोळयातले अश्रू पाहून त्यांना त्यांच्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. पुन्हा ती कृत्ये करूच नये, असा दृढ निश्चय मनाने केला. अहिंसेचे तत्त्व याच घटनेतून गांधीजींच्या मनात रूजले होते. गांधीजींची अहिंसा म्हणजे समोरच्या व्यक्तीच्या हृदयातील ईश्वर जागवणे,

समोरच्याच्या मानवतेला जीवंत करणे. आज जग झपाट्याने बदलत आहे. मानवाचे मन विभिन्न भावनात्मक हिंदोळ्यावर अक्षरश: थकत आहे. या अशा वेळी मनाचा तोल सांभाळणे कठीणच. पण एखाद्याचा तोल सुटला तर? तर त्याच्या मनातल्या ईश्वराला साद घालून त्या माणसाचा तोल सावरणे ही आजच्या जगाची अहिंसा आहे. हीच अहिंसा आज जगभरात भावनिक शक्ती म्हणून स्वीकारली जाते. बौद्धिक क्षमतेसारखीच मानसिक अहिंसा आज महत्त्वाची आहे. हीच मानसिक अहिंसा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. सत्य महात्मा गांधी यांच्या विचारात केंद्रस्थानी आहे.

**सत्याची संकल्पना**

सत्य म्हणजे खरे बोलणे किंवा खोटेपणा, फसवणूक यांपासून दूर राहणे, असा अर्थ आपण घेतो. मात्र गांधींची सत्याची कल्पना ही निव्वळ खरे बोलण्याने साकार होत नाही. त्यात जीवनाविषयीचा सखोल दृष्टिकोन आहे. सत्य म्हणजे काय, या गहन प्रश्नाला गांधीजींनी भारतीय तत्त्वज्ञान परंपरेच्या साह्याने दिलेले उत्तर या दृष्टिकोनात आहे. प्रत्येकाचे अनुभवविश्व भिन्न असते, आशा-आकांक्षा वेगवेगळ्या असतात. त्यातून जगाचे आकलनही भिन्न होते आणि प्रत्येकाचे सत्यही वेगळे असू शकते. अशा भिन्न दृष्टिकोनाच्या जंजाळात नेमके सत्य म्हणजे काय हे कसे शोधायचे? सत्य म्हणजे काय हा प्रश्न तात्त्विक आहे आणि राजकीयही. तात्त्विक यासाठी की कोणत्याही गोष्टीचा मानवाला साकल्याने बोध होण्याची शक्यता, वास्तवाचे नेमके स्वरूप, त्याच्या आकलनातल्या मर्यादा असे तत्त्वज्ञानाच्या परिघातले अनेक मुद्दे या निमित्ताने चर्चेला येतात. विविध तात्त्विक भूमिकांमधून त्याची उत्तरे निरनिराळी असतात. हा प्रश्न राजकीयही, कारण विविध दृष्टिकोनातून शेवटी सत्य म्हणून जे पुढे येते ते सहसा प्रस्थापित आणि सत्ताधारी वर्गांना साजेसे असे एक आकलन असते.

‘जिसकी लाठी उसकी भैंस’ अशी म्हण आहे. तसे सत्यही प्रस्थापिताला पटणारा दृष्टिकोन असतो. अर्थात आपण ज्याला सत्य म्हणतो ते निव्वळ एक आकलन आहे, हे मान्य करायला कोणी तयार होत नाही. आपण म्हणू तेच खरे, असा आग्रह असतो. पूर्वी घडून गेलेल्या व आता घडत असलेल्या घटनांचे अर्थ आणि त्यातले सत्य आपापल्या सोयीनुसार, हितसंबंधांनुसार माणूस स्वीकारतो. फाळणी, पाकिस्तानची निर्मिती, महात्मा गांधींची स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका, ३७० व ३७१ वे कलम अस्तित्वात येण्यामागची भूमिका, स्वतंत्र भारताच्या उभारणीत पंडित नेहरूंचे योगदान, वल्लभभाई पटेल आणि नेहरू यांचे नातेसंबंध, सुभाषचंद्र बोस-नेहरू आणि गांधी यांचे संबंध या आणि यांसारख्या अनेक बाबींमधले नेमके सत्य काय? याविषयी अनेक ‘कहाण्या’ आपल्यापर्यंत पोचतात. दिशाभूल करण्यासाठी रचलेल्या कहाण्या हा एक वेगळाच प्रकार. त्यातले धादांत असत्य कधी ना कधी उघडकीला येतेच! मात्र ज्यात अजिबात बनाव नसतो असे किस्सेसुद्धा शेवटी घडून गेलेल्या गोष्टींकडे पाहण्याचा निव्वळ एक दृष्टिकोन असतो. ठरावीक पद्धतीने लावलेला केवळ एक अर्थ असतो.व्यापक सत्याचा तो केवळ एक कवडसा असतो. कवडशालाच सूर्य मानत आपापल्या तुकड्याला कवटाळून बसणाऱ्यांचे ‘सत्य’ हे गांधींच्या सत्याच्या कल्पनेपासून कोसो दूर आहे.

**सारांश**

गांधीजींनी धर्माची साथ न सोडता धर्मालाच व्यापक आणि अधिक सहिष्णू बनवले. समाजातील प्रश्न सुटण्यासाठी संवादी भूमिकाच घ्यावी लागते, हा संदेश गांधीजी आपल्या जीवनातून देतात. गांधीजींच्या याच विचारांची कृतिशील अंमलबजावणी करायला आपण विसरलो आहोत. गांधीजींचे विचार सबंध समाजास प्रेरणा देणारे होते आणि आहेत.

त्यांच्या विचाराने चालल्यासच समाजाचे भले होईल. मोठ्या प्रमाणात तरुण गांधीजींच्या विचाराने प्रभावित होत असल्याचे समाजामध्ये पाहावयास मिळते आहे. स्वच्छता आणि 'खेड्याकडे चला'चा गांधीजींनी नारा दिला होता. मात्र, आपण या गोष्टींकडे दुर्लक्ष करीत आहोत. देशातील सध्याच्या राजकीय, सामाजिक परिस्थितीमध्ये महात्मा गांधी यांच्या विचारांची अत्यंत गरज आहे. तरुणांमध्ये गांधीजींचे विचार पोचविण्याची गरज आहे. गांधीजींच्या विचारांची अंलबजावणी होणे सध्याच्या जागतिक परिस्थितीमध्ये आवश्यक वाटते. सत्याग्रह करून यशस्वी होता येते, हे त्यांनी पहिल्यांदा दाखवून दिले. त्यांचे विचार आचरणात आणण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा.

**संदर्भ सूची**


१. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नातील भारत, साकेत प्रकाशन, २०१९

२. कपिल प्रसाद, हिंद स्वराज्य, सस्ता साहित्य मंडळ, २०२०

३. एम. के. सिंग, गांधी जी और भारतीय राष्ट्रीय आंदोलन, श्री साई प्रकाशन, २०२०

४. वी.रा. जोगळेकर, महात्मा गांधी, साधना प्रकाशन, २०१९

५. https://www.esakal.com/, सप्तरंग, २ ऑक्टोबर, २०२३

६. https://www.mahamtb.com/

७. https://www.maayboli.com/, चिन्मय कुलकर्णी